# प्रेस नोट

महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन
दिनांक -: १६/११/२०२३

**महाळुगे एमआयडीसी पोलीस स्टेशनची कारवाई :- महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये हंसा कंपनी समोर डुक्कर वाहतुक करणाऱ्या पिकअपवर जबरी दरोडा घालणाऱ्या टोळीच्या ५ तासात आवळल्या मुसक्या त्यांचेकडुन ९,५८,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल केला जप्त**

-----o0o0o-----

दि. १६/११/२०२३ रोजी रात्री ०४.०० वाजण्याचे सुमारास मौजे कुरुळी ता.खेड जि.पुणे गावचे हद्दीत स्पायसर चौक ते महाळुगे जाणारे रोडवर एच पी पेट्रोल पंपाचे जवळ हंसा फ्लेक्स कंपनीचे समोर रोडवर फिर्यादी श्री.किशोर संपत साबळे वय ३९ वर्षे, शिक्षण २ री, व्यवसाय चालक, रा. कानिफनाथ कॉलणी जुना भाऊसिंगपुरा ता.जि.संभाजीनगर हे पिकअप गाडी नंबर एम एच २० ई एल ८५७९ या गाडीत असलेले डुकरे मोकळे करण्या करिता रोडवर उभी करुन ते डुकरांची पाहणी करीत असतांना स्पायसर चौकाकडुन येणारे ३ मोटर सायकलवरील ६ इसमा पैकी दोन इसम यांनी मोटर सायकल आडवी लावुन फिर्यादी व त्यांचे सोबत असलेला प्रमोद रामराव काळे यांना लाकडी दांडा व लोखडी टॉमीने पायावर मारहाण करुन त्यांचे जवळी मोबाईल तसेच डुकरे भरलेली पिकप गाडी नंबर एम एच २० ई.एल.८५७९ ही जबरदस्तीने मारहाण करुन किंमत रुपये ९,५८,०००/- रुपये किमतीचा माल जबरीने हिसकावुन घेवुन मोटर सायकलवर असलेले एका इसमाने पिकअप गाडी चालवुन व इतर ५ इसम हे ३ मोटर सायकल वरुन पळुन गेले म्हणुन फिर्यादी यांनी दिले फिर्यादीवरुन महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन गु.र.नं. ७४८/२०२३ भा.द.वि.कलम ३९५ अन्वये अज्ञात दरोडेखोरा विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. दाखल गुन्हा हा दरोडया सारखा गंभीर स्वरुपाचा असुन सदरबाबत मा.पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी वरीष्ठ पोलीस निरीक्षक, महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन यांना सीसीटीव्ही, तांत्रिक गोष्टी व गुप्त बातमीदारा मार्फत अज्ञात आरोपीचा शोध घेवुन तात्काळ गुन्हा उघडकीस आणणेबाबत आदेशित केले होते.

दाखल गुन्हयाचे तपासामध्ये वरीष्ठ पोलीस निरीक्षक, महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन यांनी मा. वरीष्ठांच्या सुचना व आदेशाप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन केल्यावर तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळावर भेट देऊन मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे दिनांक १६/११/२०२३ रोजी पहाटे ०४/०० वा.चे सुमारास गाव मौजे कुरुळी ता.खेड जि.पुणे येथील स्पाईसर चौक ते महाळुंगे जाणारे रोडवर एच पी पेट्रोल पंपाचे जवळ हंसा फ्लेक्स कंपनीचे समोर रोडवर आरोपी नामे राजकुमार महिंदर रिडलान वय ३० वर्षे,धंदा – पिग मिट शॉप, रा. झेडेमळा,नायडुनगर, देहुरोड ता.हवेली जि.पुणे याने तसेच त्याचे सोबत असलेले साथीदार यांनी डुक्करे भरुन जात असलेल्या महिंद्र पिकअप गाडी क्र.एम.एच.२० ई.एल.८५७९ हिचे वरील चालक किशोर संपत साबळे व त्याचे सोबत असलेले इसम नामे प्रमोद रामराव काळे यांना लाकडी दांडा व लोखंडी टॉमीने मारहान करुन त्याचे ताब्यातील डुक्कराने भरलेला पिकअप, व त्यांचे मोबाईल जबरदस्तीने मारहाण करुन हिसकावुन घेवुन गेले असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

दाखल गुन्हयामध्ये मिळालेल्या गुप्त माहीतीच्या आधारे, तांत्रीक विश्लेशन करुन तपास केला असता आरोपी नामे राजकुमार महिंदर रिडलान वय ३० वर्षे, धंदा – पिग मिट शॉप, रा. झेडेमळा,नायडुनगर, देहुरोड ता.हवेली जि.पुणे हा असल्याचे समजले याचेकडे तपास करता सुरुवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली परंतु त्यास विश्वासात घेवुन सखोल तपास करता त्याने सदरचा गुन्हा हा त्याचे साथीदार १) राम मदान मोटे वय २६ वर्षे रा. खराबवाडी ,सारासिटी ता खेड जि पुणे मुळ रा. वडगाव माळी ता.मेहकर जि.बुलढाणा २) समाधान पांडुरंग राठोड वय – ३३ वर्षे रा. अनिल गाडे यांचे रुममध्ये निघोजे ता.खेड जि.पुणे मुळ रा. तांबोळा ता. लोनार जि.बुलढाणा ३) सोमनाथ अंकुश येळवंडे वय – ४१ वर्षे, रा.आर्यन लॉज जवळ निघोजे ता.खेड जि.पुणे व ४) (एक विधी संघर्षग्रस्त बालक) यांचे

मदतीने सदरचा गुन्हा केला असल्याचे सांगितल्याने वरील नमुद आरोपी मजकुर याचेकडुन चोरीस गेलेला माल जप्त करण्यात आला आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | एकुण जप्त माल | किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१ | महाळुंगे | ७४८ /२०२३ भा.द.वि. कलम ३९५ अन्वये | १) ७,०००००/रु. एक महिंद्रा कंपनीची बोलेरो पिकप गाडी नंबर एम एच २० ई एल ८५७९ अशी जुनी वापरती कि.अ.<br>२) ५,०००/- एक लावा कंपनीचा मोबाईल त्यामध्ये जीओ कंपनीचे सिमकार्ड नं. ७७२१८०३९०२ व ९३५९७६०५९२ असे नंबर असलेले जुना वापरता कि. अ.<br>३) ३,०००/- एक नोकिया कंपनीचा मोबाईल त्यात जीओ कंपनीचे सिमकार्ड नंबर ९३७०१२९१५९ असा नंबर असलेला जुना वापरता कि. अ.<br>४) २,५०,०००/- रुपये किमतीची एकुन ४७ डुकरे असे मिळुन किमत सुमारे | ९,५८,०००/- |

➢ **अटक आरोपींची नावे :–**

१) राजकुमार महिंदर रिडलान वय ३० वर्षे, धंदा – पिग मिट शॉप, रा. झेडेमळा,नायडुनगर, देहुरोड ता.हवेली जि.पुणे

२) राम मदान मोटे वय २६ वर्षे रा. खराबवाडी ,सारासिटी ता.खेड जि.पुणे मुळ रा. वडगाव माळी ता.मेहकर जि.बुलढाणा

३) समाधान पांडुरंग राठोड वय – ३३ वर्षे रा. अनिल गाडे यांचे रुममध्ये निघोजे ता.खेड जि.पुणे मुळ रा. तांबोळा ता. लोनार जि.बुलढाणा

४) सोमनाथ अंकुश येळवंडे वय – ४१ वर्षे, रा आर्यन लॉज जवळ निघोजे ता.खेड जि.पुणे

५) विधी संघर्षग्रस्त बालक :– एक (पालकांच्या ताब्यात दिले)

## वाहन चालकांना आवाहन

**याद्वारे सर्वांना आवाहन करण्यात येते की,एमआयडीसी परिसरामध्ये वाहन चालकांनी वाहन निर्जन्यस्थळी थांबु / पार्क करु नयेत. सी सी टि व्हि कॅमेरे व लाईट लावाव्यात तसेच कंपनी परिसरामध्ये संशयित हालचाल दिसल्यास पोलीसांशी संपर्क साधावा त्यामुळे वाहान चोरी, वाहनातील माल व डिझल चोरीस प्रतिबंध निर्माण होईल.**

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त **श्री.विनयकुमार चौबे**, मा. सह पोलीस आयुक्त, **श्री. संजय शिंदे** मा.अपर पोलीस आयुक्त **श्री.वसंत परदेशी**, मा.पोलीस उप-आयुक्त **श्री संदिप डोईफोडे**, सहाय्यक पोलीस आयुक्त **श्री राजेंद्रसिंग गौर** यांचे सुचना व मार्गदर्शना खाली **वरीष्ठ पोलीस निरीक्षक** श्री.वसंतराव बाबर, **पोलीस उप-निरीक्षक** विलास गोसावी, **पो.हवा.** युवराज बिराजदार, विठ्ठल वडेकर, राजु जाधव **पो.कॉ./** शिवाजी लोखंडे, गणेश गायकवाड, राजेंद्र खेडकर, अमोल माटे यांनी केली आहे. पुढील तपास पोलीस उप निरीक्षक प्रदिप गायकवाड, महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

( संदिप डोईफोडे )
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ-३, पिंपरी चिंचवड